दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १७१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२१ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## शिंदे गटाच्या बंडानंतर प्रथमच उद्धव ठाकरेंची जाहीर सभा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिंदे गट आणि शिवसेनेतील संघर्ष वाढताना दिसत आहे. यातच शिंदे गटाच्या बंडानंतर पहिल्यांदाच उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

शिवसेनेचा दसरा मेळावा शिवतीर्थावर होणार की नाही, यावर अद्याप स्पष्टता नसली तरी, दसरा मेळाव्याआधीच उद्धव ठाकरेंची तोफ मुंबईत धडाडणार आहे. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने उद्धव ठाकरेंनी गटप्रमुखांचा मेळावा आयोजित केल्याचे सांगितले जात आहे. गेली अनेक वर्ष सत्ता असलेली मुंबई महानगरपालिका आपल्याच ताब्यात ठेवण्याचे मोठे आव्हान उद्धव ठाकरेंसमोर आहे. उद्धव ठाकरेंविरुद्ध भाजप, मनसेसह शिंदेगटाचं आव्हान असणार आहे. तेव्हा आपला गड मजबूत करण्यासाठी उद्धव ठाकरे नेस्कोच्या मैदानात उतरणार आहे.

# नाट्य-चित्रपट क्षेत्राच्या गतवैभवासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**आपली संस्कृती, कला जोपासलीच पाहिजे. ती आपली जबाबदारी आहे. त्यामुळे मराठी नाट्य, चित्रपट आणि कला क्षेत्राला गतवैभव प्राप्त व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील,'अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मराठी नाट्य, चित्रपट आणि मालिका क्षेत्रातील मान्यवरांशी मुख्यमंत्र्यांनी 'मला तुमचं ऐकायचंय...! आपण एकमेकांबद्दल बोलत असतो. आता एकमेकांशी बोलुया.., असं म्हणत एका विशेष भेटीत दिलखुलास संवाद साधला. यावेळी मराठी नाट्य, चित्रपट आणि मालिका क्षेत्रातील निर्माते, दिग्दर्शक, कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



**गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये चांगले रस्ते, पायाभूत सुविधा, प्रवासी वाहतुक व्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने पावले उचलण्याचे निर्देश दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. चित्रपटांना जीएसटी मधून सूट, ज्येष्ठ कलाकारांसाठी मानधन योजना, त्यांना विनामूल्य वैद्यकीय सुविधा, ज्येष्ठ कलाकार, वादक, तंत्रज्ज्ञ आदींना विमा संरक्षण याबाबत तसेच अनेक धोरणात्मक बाबींविषयी मंत्रालयात बैठक आयोजित करून संबंधित विभागांच्या समन्वयाने चर्चेतून मार्ग काढला जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी आश्वस्त केले. तसेच चित्रनगरीला भेट देऊन पाहणी करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.**

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, कला क्षेत्राकडे पाहताना आपल्याला कायम त्यामागील झगमगाट दिसतो. मात्र कलाकारांच्या व्यथा त्यांचे प्रश्न समजत नाहीत. ते जाणून घेण्याचा हा प्रयत्न आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघेसाहेब या दोघांनाही कला, संस्कृती आणि मराठी कला क्षेत्राविषयी जिव्हाळा होता. या क्षेत्रातील पडद्यामागील कलावंत, तंत्रज्ज्ञ यांच्याची निगडीत असे अनेक विषय आहेत. त्यांना परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत यापासून विमा संरक्षण अशा सर्वच बाबतीत सकारात्मक निर्णय घेतले जातील. नाट्यगृहांची परिस्थिती सुधारणे, एकपडदा चित्रपटगृहांच्या समस्या तसेच चित्रपटांसाठी कर सवलत तसेच अन्य मुद्यांवरही विचारविनीमय, चर्चेने उपाययोजना केल्या जातील. संस्कृती, कला जोपासली गेली पाहिजेत. या गोष्टी संवर्धन व्हावे यासाठी प्रयत्न केले जातील. समाजासाठी या गोष्टी महत्वाच्या आहेत. यातूनच उत्तम कलावंत घडतील, ते देश आणि आपल्या राज्याचा नावलौकीक वाढवतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे आपल्या नाट्य, चित्रपट सृष्टीला गतवैभव पुन्हा मिळावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

या संवादा दरम्यान निर्मिती, दिग्दर्शन, अभिनय अशा विविध क्षेत्रातील मान्यवर सर्वश्री प्रशांत दामले, अशोक सराफ, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे, श्रीमती वर्षा उसगांवकर, निर्माता विद्याधर पाठारे, मंगेश कुलकर्णी, पुष्कर श्रोत्री, जितेंद्र जोशी, गायक अवधूत गुप्ते, विजय पाटकर, विजय केंकरे, प्रसाद ओक, चंद्रकांत कुलकर्णी यांनी प्रातिनिधीक स्वरूपात त्या-त्या क्षेत्रातील समस्या, मुद्यांची मांडणी केली. तसेच याबाबी समजावून घेण्याकरिता आवर्जून आयोजित केलेल्या या संवाद उपक्रमाचे स्वागतही केले.

# सँण्डोज आणि अमेरिकेर्स यांच्याकडून पनवेल महापालिकेस रुग्णवाहिका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिका आयुक्त गणेश देशमुख ,उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, साहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, वाहन विभाग प्रमुख राजेश डोंगरे यांच्या उपस्थितीत सँण्डोज आणि अमेरिकेर्स कंपनीने महानगरपालिकेस आज एक रुग्णवाहिका दिली. 'बेसीक लाईफ सपोर्ट ' ही रुग्णवाहिका कंपनीच्या २०२२-२३ च्या सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर फंड) देण्यात आली आहे. यावेळी सँडूज आणि अमेरिकेर्स कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पनवेल महापालिका क्षेत्रातील आरोग्य सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून आयुक्त गणेश देशमुख विविध उपाय योजना राबवित आहेत. पनवेल महानगरपालिकेकडे स्व मालकीच्या तीन रुग्णवाहिका असून सी एस आर फंडातून आजपर्यंत दीपक फर्टीलायझर्स अँड पेट्रो केमिकल्स कंपनी, आदित्य बिर्ला कंपनी, युनायटेड ब्रेवरीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, सँण्डोज व अमेरिकेर्स इंडिया फाउंडेशन यांच्याकडून चार रूग्णवाहिका देण्यात आले आहेत. महापालिकेकडे आता एकूण ७ रुग्णवाहिका आहेत.

महापालिका कार्यक्षेत्रातील चार प्रभागांमधील सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांसाठी यापैकी एक एक रूग्णवाहिका देण्यात येणार आहे व एक रूग्णवाहिका की गरोदर स्त्रीयांसाठी २४ तास कार्यरत ठेवण्यात आली आहे. कोरोना काळात महापालिकेला रूग्णांची ने आण करण्यासाठी या रूग्णवाहिकांची मोठी मदत झाली.

रूग्णांना तातडीने इतरत्र नेण्यासाठी रूग्णवाहिका महत्वाची ठरते. गरोदर माताकरिता रुग्णवहिका तात्काळ उपलब्ध होणेकरीता वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत मार्फत टोल फ्री क्रमांक १८००२२००१६ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.




# पनवेलमध्ये शिवसेने तर्फे रामदास कदम यांचा जाहीर निषेध

## रामदास कदम यांच्या फोटोला चपलांचा प्रसाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना व शिवसेना नेत्यांबाबत गलिच्छ आणि अशलाघ्य वक्तव्य करणाऱ्या रामदास कदमांचा आज जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली पनवेल शिवसेने तर्फे चांगलाच समाचार घेऊन त्यांचा जाहीर निषेध करण्यात आला तसेच महिला आघाडीने त्यांच्या फोटोला चपलांचा प्रसाद दिला.

शिवसेना जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली सल्लागार शिरीष बुटाला, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, तालुका प्रमुख विश्वास पेटकर, महानगर प्रमुख एकनाथ म्हात्रे, महानगर संघटक शशिकांत डोंगरे, महानगर संघटक दिपक घरत, तालुका प्रमुख संदीप तांडेल, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, उपमहानगर संघटक शिवाजी दांगट, उप महानगर संघटक अच्युत मनोरे, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, शहरप्रमुख सदानंद शिर्के, शहर प्रमुख यतीन देशमुख, शहर प्रमुख डी. एन. मिश्रा, युवासेना उपजिल्हा युवाधिकारी अवचित राऊत, पराग मोहिते, सनी टेमघरे, अनिल तळवणकर, महिला आघाडी विधानसभा संघटिका रेवती सपकाळ, रुपाली कवळे, उज्वला गावडे, संगीत राऊत, मीना सदरे, संचित राणे, सानिका मोरे, आदींसह मोठ्या प्रमाणात शिवसैनिक, युवासेना व महिला आघाडी पनवेल शिवसेना मध्यवर्ती शाखा येथे उपस्थित राहून त्यांनी रामदास कदम यांच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेत त्यांच्या विकृतीचा तसेच त्यांना असलेल्या सत्तेच्या माजाचा जाहीर निषेध करीत त्यांच्या फोटोला चपलांचा प्रसाद सुद्धा यावेळी देण्यात आला .तसेच यापुढे रामदास कदम यांना पनवेल परिसरात फिरून देणार नाही असा इशारा सुद्धा दिला.

# एक दिवसीय जात पडताळणी शिबिरात प्रमाणपत्र वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर नीट आणि इतर शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य असते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण ध्यानात घेता जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात धावपळ होते. ही धावपळ थांबवण्यासाठी पनवेलमध्ये मंगळवार (२० सप्टेंबर) एकदिवसीय शिबिराचे आयोजन जेष्ठ नागरीक सभागृह पनवेल येथे करण्यात आले होते. कोकण विभागीय आयुक्त, प्रांतअधिकारी राहुल मुंडके व तहसिलदार विजय तळेकर यांनी संयुक्तपणे निर्णय घेऊन खास विद्यार्थ्यांसाठी हे शिबिर राबविले आहे.

केंद्र सरकारचा १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर हा सेवा पंधरवडा सुरू आहे. या पंधरवडा अंतर्गत पनवेलमध्ये एक दिवसीय जात वैधता प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये ५५ जात पडताळणी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले तसेच जे विद्यार्थी कागदपत्रे घेऊन शिबिरात उपस्थित होते त्या सर्व विद्यार्थी यांचे अर्ज याच ठिकाणी ऑनलाईन करुन शिबिरामार्फत एकाच दिवसात ४० विद्यार्थ्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र वितरीत केले गेले. याचबरोबर कातकरी समाजातील नागरीक, विद्यार्थी यांना जातीचा दाखला, संजय गांधी निराधार योजनेखाली कोव्हिड मुळे विधवा झालेल्या महिला भगिनी व अपंग नागरीक यांना लाभ मंजूरीचे पत्र देण्यात आले. शिबिरात जात पडताळणी समिती अध्यक्ष डॉ. भरत बास्टेवाड व तहसिलदार पनवेल विजय तळेकर यांनी मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थी / पालक / स्वंसेवी संस्था प्रतिनीधी यांनी मनोगत व्यक्त करुन शासनाचे आभार मानले.





# पालीत कुत्र्यांचा १० जणांना चावा

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

प्रसिद्ध अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात पिसाळलेल्या, भटक्या व जखमी कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. पिसाळलेल्या कुत्र्यांनी आठवडाभरात आतापर्यंत १० जणांना चावा घेतला आहे. शिवाय अनेक भटक्या कुत्र्यांना देखील पिसाळलेल्या कुत्र्याने चावून जखमी केले आहे.



मागच्या बुधवारी (ता.१४) एका दिवसात तब्बल ७ जणांना कुत्रा चावला होता. आणि हे सर्व पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबिजचे इंजेक्शन घेण्यासाठी आले होते. एका पिसाळलेल्या काळ्या कुत्र्याने तर पालीत अक्षरशः दहशत पसरवली आहे. हा कुत्रा दिसेल त्याच्या अंगावर धाव घेऊन त्याला चावत होता. इतर कुत्र्यांचा तर त्याने जीवच घेतला. अखेर सोमवारी (ता.१९) सकाळी नाईलाजाने या कुत्र्याला मारण्यात आले. मात्र आता या कुत्र्याने जखमी केलेल्या कुत्रांना रेबिजची लागण होऊन ते पिसाळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे पालीतील नागरिकांमध्ये भीतीचे

.../२

# पारंपरिक लोककलेचे सामने दरवर्षी होणार : सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या शक्ती-तुरा नाचाने या सांस्कृतिक कार्यक्रमाची रंगत चांगली वाढली. हे नाच पाहण्यासाठी पंचक्रोषीतिल मोठी गर्दी झाली होती. श्रीवर्धन तालुका राष्ट्रवादी काँग्रेस व सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान यांनी या नाचाच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यावेळी कोंकणातील लोप होत चाललेली ही पारंपरिक अशी सांस्कृतिक लोककला आपण अशीच जपत राहू व दरवर्षी अशाच यापेक्षा ही भव्यदिव्य स्पर्धा होतील असे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.



यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्यासह श्रीवर्धन मतदार संघाचे अध्यक्ष महम्मद भाई मेमन, तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, दिघी सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संदिप पोमन, दिवेआगर सरपंच उदय बापट, युवक अध्यक्ष सिद्धेश कोसबे, सचिन किर, मंदार तोडणकर, नंदु पाटील महादेव पाटील, गणेश पाटील, शाहिर वसंत भोईर, श्रीवर्धन शहर अध्यक्षा राजेश्री मुरकर, ऋतिका हावरे आदि मान्यवर उपस्थित होते. श्रीवर्धन तालुक्यातील शाहिरांनी विविध शैलीतून आपली कला सादर करून बहारदार गाणी सादर केल्याने, व कलावंताकडुन चाललेली चढाओढ याची रंगत उत्तरोत्तर वाढत गेली. कालौघात शक्ती-तुरा ही लोककला हळूहळू कमी होत असल्याने असे नाच कित्येक वर्षांनी पहावयास मिळाले. या नाचकलेची आवड असलेल्यांनी मोठी हजेरी लावत कलावंतांना प्रोत्साहान देतानाच आयोजकांनाही धन्यवाद दिले. ही परंपरागत कला जोपासण्याची नितांत गरज असल्याची भावनाही काहींनी व्यक्त केली. कलेच्या प्रचार व प्रसार व्हावा यासाठी घेत असलेल्या मेहनती बद्दल संयोजक सुरेश महाबळे व राजाराम टेंबे यांचे सर्वत्र कौतूक होताना दिसत आहे. तर येथे संपन्न

.../२

# समरकंदमधील दिशा

जगातील सर्वांत मोठी प्रादेशिक सहकार्य संघटन असलेल्या 'शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन'ची (एससीओ) समरकंद येथे गेल्या आठवड्यात झालेल्या परिषदेवर रशिया-युक्रेन युद्धाचे सावट असणे स्वाभाविक होते. रशिया, उझबेकिस्तान, कझाकस्तान, किरगिझिस्तान, ताजिकिस्तान, चीन, भारत आणि पाकिस्तान अशी युरोप आणि आशिया खंडांतील सदस्य देशांच्या या संघटनेची यंदाची परिषद उझबेकिस्तानमधील समरकंद या ऐतिहासिक शहरात पार पडली. प्रादेशिक सहकार्य वृद्धिंगत करण्यावर भर देतानाच सदस्य देशांच्या प्रमुखांनी त्यांच्या चिंतांनाही वाट करून दिली. ठळक चिंता अर्थातच रशिया-युक्रेन युद्धाची होती. उझबेकिस्तान, कझाकस्तान, किरगिझिस्तान, ताजिकिस्तान आदी देश तत्कालीन सोव्हिएट संघाचे भाग होते. सोव्हिएट संघाच्या विघटनानंतर स्वतंत्र होऊन तीन दशके लोटली असली, तरी या देशांना रशियाबद्दल चिंता वाटणे साहजिक म्हणावे लागेल. रशियाचे वर्तनही तसे राहिले आहे. त्याने प्रथम क्रिमियाचा घास घेतला आणि आता त्याने युक्रेनवर युद्ध लादले आहे. गेल्या सात महिन्यांपासून सुरू असलेल्या या युद्धाची झळ जगाला बसली आहे. आपल्याबाबतीत रशिया असे करणार तर नाही ना, अशी भीतीही या देशांना आहे. म्हणूनच समरकंद परिषदेत या युद्धाचा विषय चर्चिला गेला. या युद्धाबाबत भारताने 'तटस्थ' भूमिका घेतली असली, तरी चर्चेने प्रश्न सोडविण्याचे आवाहन सातत्याने केले होते. तोच धागा पुढे नेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, 'सध्याचे युग युद्धाचे नसल्याचे' रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय चर्चेत स्पष्टपणे सांगितले. त्यांच्या या भूमिकेचे पाश्चिमात्य जगताकडून स्वागत झाले. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनीही हा मुद्दा उपस्थित केला. युद्धात रशियाची बाजू डळमळीत होत असल्याने पुतिन यांनीही या मुद्द्याला उत्तर दिले. या संघटनेत सुरुवातीपासूनच चीन आणि रशिया यांचे वर्चस्व राहिले आहे. मध्य आशियाई देशांबरोबरच भारत आणि पाकिस्तान यांचाही समावेश झाल्याने संघटनेची व्याप्ती वाढली आहे. इराण, मंगोलिया, अफगाणिस्तान हे देश निरीक्षक आहेत, तर अफगाणिस्तान, नेपाळ, श्रीलंका, आर्मेनिया, टर्की, बेलारुस संवादातील भागीदार. 'एससीओ'च्या विस्ताराची दिशा यातून दिसते. अशा व्यासपीठाकडे संधी म्हणून पाहायला हवे. चीन आणि पाकिस्तान यांच्याबरोबर भारताचे संबंध ताणलेले आणि प्रश्नांनी भरलेले आहेत. लडाखमधून माघारीची प्रक्रिया सुरू झाल्याने चीनबरोबरील तणाव काहीसा कमी होत आहे; परंतु आजवरचा अनुभव पाहता चीनवर विश्वास सहज विश्वास ठेवता येणार नाही. पाकिस्तानमध्ये सत्तांतर झाले असले, तरी त्या देशाची भारताबाबतची भूमिका बदललेली नाही. त्यामुळे उभय देशांतील संबंध गोठलेलेच आहेत. या पार्श्वभूमीवर उभय देशांशी संबंधित मुद्दे समरकंदमध्ये भारताने उपस्थित केले नाहीत. अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय परिषदांत राष्ट्रहिताबरोबरच सर्वसमावेशक भूमिका घेणे आवश्यक असते. तसा प्रयत्न भारताने केला. एक संतुलित भूमिका मांडण्याचा आणि प्रादेशिक सहकार्यातून सर्वांना होणाऱ्या लाभाचा मुद्दा भारताने मांडला. 'एससीओ'मधील देशांत मुक्त दळणवळणाचा मुद्दा मोदी यांनी उपस्थित केला. 'विश्वासार्ह, लवचिक आणि वैविध्यपूर्ण अशी भक्कम पुरवठा साखळी' उभारण्याचे आवाहन त्यांनी केले. बदलत चाललेली जागतिक स्थिती, अन्न आणि इंधनपुरवठ्याची आवश्यकता यांचा संदर्भ त्यांच्या या विधानाला होता. इराणमधून पाकिस्तानमार्गे भारतात वायुपुरवठा करण्याच्या प्रकल्पाची पार्श्वभूमीही त्याला आहे. पुतिन यांच्याखेरीज मोदी यांची उझबेकीस्तान, इराण आणि टर्की या देशांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा झाली. इराणचे अध्यक्ष इब्राहीम रइसी यांच्याबरोबरील चर्चा तेलाची आयात आणि चाबहार बंदराद्वारे होणारे दळवळण या दृष्टीने महत्त्वाची होती. अमेरिकेच्या निर्बंधांनंतर भारताने इराणकडून तेल आयात करणे थांबविले आहे. युक्रेनबरोबर युद्ध सुरू केल्यानंतर रशियाकडून तेल आयात करण्यालाही अमेरिकेने निर्बंध घातले; परंतु ते नाकारत भारताने आयात चालू ठेवले. हीच भूमिका आपल्याबाबतही भारताने घ्यावी, अशी इराणची अपेक्षा आहे. गुणात्मक दर्जा आणि अंतर या दोन्ही दृष्टिकोनातून इराणकडून तेल आयात करणे भारताला फायद्याचे ठरू शकते. मात्र, भारताने या दिशेने पाऊल टाकलेले नाही. मोदी-रइसी यांची भेट ही त्यासाठी उपयुक्त ठरू शकते. मध्य आशियाई देशांबरोबरील आणि अफगाणिस्तानबरोबरील व्यापाराचा मार्ग पाकिस्तानातून जातो. याचा अप्रत्यक्ष उल्लेख मोदींच्या भाषणात होता. शांघाय सहकार्य संघटनेच्या पुढील वर्षाच्या परिषदेचे यजमानपद भारताकडे आले आहे. ही परिषद २०२३मध्ये नवी दिल्लीत भरेल. यजमान म्हणून भारताची जबाबदारी नक्की वाढेल. समरकंदमध्ये मोदी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांच्यात चर्चा झालेली नाही. त्यामुळे नवी दिल्लीतील परिषदेस पाकिस्तान उपस्थित राहील काय हे कालांतराने स्पष्ट होईलच. एकुणात समरकंदमधील चर्चा प्रादेशिक सहकार्यासाठी उपयुक्त ठरली हे नक्की.

# शिवसेना सुधागड तालुका प्रमुख मिलिंद देशमुख यांचा पदाचा तडकाफडकी राजीनामा

## सुधागड तालुका प्रमुख पदाची धुरा कुणाच्या खांद्यावर येणार? चर्चांना उधाण

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राज्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व शिंदे गटात सत्तासंघर्ष सुरू असून अखंड शिवसेनेत उभी फूट पडली आहे. या राजकीय घडामोडीने तालुका, जिल्हा व राज्यातील राजकीय समीकरणे बदलून गेलीत. अशातच सुधागड तालुका शिवसेनेचे सलग नऊ वर्षांपासून तालुका प्रमुख पदाची धुरा सांभाळणाऱ्या मिलिंद देशमुख यांनी मंगळवारी दि.(२०) रोजी आपल्या तालुकाध्यक्ष पदाचा तडकाफडकी राजीनामा दिलाय.

शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांची भेट घेऊन त्यांच्या कडे राजिनामा सुपूर्द केलाय. देशमुख यांच्या राजीनाम्यानंतर शिवसेना सुधागड तालुका प्रमुख पदाची धुरा कुणाच्या खांद्यावर येणार? याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. मिलिंद देशमुख यांनी सुधागड तालुका शिवसेना प्रमुख पदावरून काम करताना पक्षसंघटना वाढीसाठी तन मन धनाने योगदान दिले होते. जनतेचे विविध प्रश्न व समस्यांना न्याय देण्याची भूमिका बजावली होती. शिवसेनेतून अनेक सहकारी इतर पक्षात सोडून गेले तरी त्यांनी मात्र सुधागड शिवसेनेचा गड प्रामाणिकपणे व भक्कमपणे सांभाळला होता. त्यांच्या तडकाफडकी राजीनाम्याने पाली सुधागड सह जिल्ह्यात चर्चेचे गुऱ्हाळ उठले आहे. मिलिंद देशमुख यांच्या पुढील राजकीय भूमिकेकडे साऱ्यांचे लक्ष लागले असून ते शिवसेनेत पुढेही निष्ठेने राहतील की अन्य राजकीय भूमिका स्वीकारतील हीच चर्चा सर्वत्र ऐकावयास मिळत आहे. मिलिंद देशमुख यांनी राजीनामा पत्रात नमूद केले आहे की हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने गेली नऊ वर्ष सुधागड तालुका प्रमुख म्हणून काम करण्याची संधी मिळाली. सद्यस्थितीत वैयक्तीक कामकाजामुळे शिवसेना पक्षसंघटनेसाठी आवश्यक तो वेळ देता येत नाही. तरी पक्षाची संघटनात्मक हाणी होऊ नये या करिता तालुका प्रमुख पदाचा राजीनामा देत असल्याचे देशमुख यांनी म्हटलंय. नऊ वर्षात पक्ष श्रेष्टींनी आपल्यावर विश्वास दाखविला, त्याबद्दल मिलिंद देशमुख यांनी ऋण व्यक्त केले असून एक शिवसैनिक म्हणून पक्ष संघटनेत अखंडपणे कार्यरत राहीन असा विश्वास देशमुख यांनी व्यक्त केलाय.

दरम्यान मिलिंद देशमुख यांनी आपली भूमिका स्पष्ट केली असली तरी त्यांच्या राजीनाम्यानंतर चर्चांच गुऱ्हाळ उठलं आहे. देशमुख आपली पुढील राजकीय भूमिका काय घेणार? ते शिव-सेनेत राहणार की सत्ताधारी शिंदे गटात जाणार ?अशा चर्चांना देखील तालुक्यात उधाण आलेय.

# हाळ खुर्द गावातील मुस्लिम व आदिवासी समाजबांधवांना दफनभूमी उपलब्ध करून द्या

**दै.रायगड नगरी । खोपोली**



हाळ खुर्द गावात मुस्लिम समाजाची तीन ते चार हजारांहून अधिक लोकसंख्या असून गेल्या ७५ वर्षात या गावाला हक्काची दफनभूमी (कब्रस्तान) नाही. या गावातील नागरिकांना मयत (मृतदेह) दफन करण्यासाठी एक किलोमीटर अंतरावर असलेल्या खोपोली नगर परिषद हद्दीतील कब्रस्तानात जावे लागते. खोपोली शहराची वाढती लोकसंख्या पाहता हे कब्रस्तान त्यांनाच अपुरे पडत आहे अशा परिस्थितीत हाळ खुर्द येथील मुस्लिम व आदिवासी समाजबांधवांना दफनभूमी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन, पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली (भारत), रायगड संघर्ष समिती व सुन्नी शाफिया मदिना मस्जिद ट्रस्टने केली आहे.

दरम्यान, संघटनेच्या वतीने खालापुर तहसीलदार अय्युब तांबोळी यांना मुस्लिम कब्रस्तान व आदिवासी स्मशानभूमीबाबत आज (दि. २०) निवेदन देण्यात आले. यावेळी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे महाराष्ट्र राज्य मार्गदर्शक तथा रायगड संघर्ष समिती मुख्य संयोजक जेष्ठ पत्रकार पैलवान हनुमंतराव ओव्हाळ, हाळ खुर्द गाव-ाचे सरपंच लता पवार, उपसरपंच आजिम करजीकर, ग्राम पंचायत सदस्य तथा सुन्नी शाफिया मदिना मस्जिद ट्रस्टी हानिफ करजीकर, लेखणीक नरेंद्र धारणे, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य महासचिव तथा पोलीस मित्र संघटना रायगड जिल्हा महासचिव खलील सुर्वे, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य सचिव नरेश जाधव आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले की, हाळ खुर्द गावात मुस्लिम समाजाची तीन ते चार हजारांहून अधिक लोकसंख्या असून गेली ७५ वर्ष या गावाला हक्कांची दफनभूमी (मुस्लिम कब्रस्तान) नाही. या गावातील नागरिकांना मयत दफन करण्यासाठी १ किलोमीटर अंतरावर असलेल्या खोपोली नगर परिषद हद्दीतील कब्रस्तानात जावे लागते. खोपोली शहराची लोकसंख्या पाहता हे कब्रस्तान त्यांनाच अपुरे पडत आहे. अशा परिस्थितीत हाळ खुर्द येथे स्वतंत्र कब्रस्तान होणे महत्वाचे आहे. संपूर्ण देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना एका गावाला दफनभूमी सुध्दा नसावी, ही खरंच खेदजनक बाब आहे. गावाच्या शेजारी तसेच गावाच्या मालकीची अनेक एकर शासकीय जागा असताना त्यातून दोन एकर जागा कब्रस्तानासाठी उपलब्ध करून द्यावी. तसेच आदिवासी समाजबांधवांना देखील १ एकर जागा स्मशानभूमीसाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, या निवेदनाच्या प्रती केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री, महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अल्पसंख्यांक मंत्री, कोकण विभागीय आयुक्त, रायगड जिल्हाधिकारी, कर्जत प्रातांधिकारी आदींना पाठविण्यात आल्या आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी व रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त नांदगावमध्ये रक्तदान शिबीर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय जनता पार्टी दक्षिण रायगड जिल्हा सेवा पंधरवडा रक्तदान संकल्प साजरा करण्यात येत असून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केबिनेट मंत्री नाम. रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा कार्यक्रमांतर्गत मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील प्राथमिक आरोग्य पथक-उप आरोग्य केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला.



भारतीय जनता पार्टी दक्षिण रायगड जिल्हा सेवा पंधरवडा रक्तदान संकल्प कार्यक्रमांतर्गत आयोजित रक्तदान शिबीर कार्यक्रमाप्रसंगी रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिबिराला प्रत्यक्ष भेट देऊन समाधान व्यक्त केले. यावेळी भा.ज.पा.तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, जिल्हा कार्यकारिणी सदस्य ज्येष्ठ नेते जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे, शैलेश काते, जयवंत अंबाजी, तालुका संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण,परेश किल्लेकर, विनोद (बाळा) भगत, संजय पाटील, शहर अध्यक्ष उमेश माळी, महेश मानकर, सोशल मीडिया अध्यक्ष संदीप चिरायू, अभिजित पानवलकर, गणेश कट, नरेश वारगे, जीवन सुतार, सुदाम वाघिलकर, अल्पसंख्याक सरचिटणीस हनीफ उलडे, युवती महिला अध्यक्ष भाविका किल्लेकर, अल्पसंख्याक महिला अध्यक्ष नसीम उलडे, मधूकर पाबरेकर, धनेश गोगर, राजीव पाटील, कामगार आघाडीचे प्रवीण भाटकर , जिल्हा रक्त संक्रमण पेढीचे तज्ञ डॉक्टर श्रेयस पाटील तसेच प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.नजीर कबले, परिचारिका व कर्मचारी तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराला संपूर्ण तालुक्यातून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# सामाजिक न्याय विभागाकडून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी यांच्याकरिता सेवा पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय यांच्यामार्फत दि.१७ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत सेवा पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्राच्या माध्यमातून जात पडताळणी प्रमाणपत्र, भारत सरकार शिष्यवृत्ती डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, करियर मार्गदर्शन इत्यादीबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी अलिबाग व रोहा येथे नगरपरिषदेच्या सहकार्यातून आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापनाचे व्याख्यान व आरोग्य तपासणी शिबिर अशा विविध कार्यक्रमांचे या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

तरी ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी, महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थीनी व शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी/विद्यार्थीनींनी या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण, सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव यांनी केले आहे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात नेमलेल्या कार्यबल गटाच्या अहवालातील शिफारशींनुसार राज्यात या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. कार्यगटाच्या सदस्यपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहा मंत्र्यांचा समावेश आहे.

राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायत्तता आणि उत्कृष्टता सक्षम करणे, शाळांपासून कौशल्य विकास तसेच उच्च आणि तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करणाऱ्यासाठी हा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. राज्य स्तरावरील सर्व शिक्षण संस्था आणि विभागांना, पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण संस्थांपर्यंत यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील दृष्टिकोनानुसार, गुंतवणुक आणि संसाधने यांचा मेळ घालण्यासाठी तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी या कार्यगटाची स्थापना करण्यात आली आहे.

या कार्यगटाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असून सदस्यपदी उपमुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री, शालेय शिक्षण मंत्री, पशुसंवर्धन व दुग्धविकास व्यवसाय मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि कृषी मंत्री तर उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव समितीचे सदस्य सचिव आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सक्षम सनियंत्रणासाठी म्हणून हा कार्यगट काम करेल. डॉ. माशेलकर समितीच्या शिफारशींनुसार विविध विषयांवर स्थापन करण्यात येणाऱ्या समित्यांच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे व धोरणाच्या अनुषंगाने होणाऱ्या नवनवीन बदलांबाबत चर्चा, विषय समित्यांच्या अहवालातील शिफारशींनुसार विभागामार्फत करण्यात आलेल्या किंवा करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा आढावा घेणे तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणात करावयाचे बदल याविषयी धोरणात्मक चर्चा करणे अशी या कार्यगटाची कार्यकक्षा असणार आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पालीत कुत्र्यांचा १० जणांना चावा

वातावरण आहे. पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे नागरिक प्रचंड दहशतीखाली आहेत.

येथील हटाळेश्वर चौक, बल्लाळेश्वर मंदिर परिसर, शाळा, बाजारपेठ, बसस्थानक, बँक ऑफ इंडियाजवळ तसेच सर्व आळ्यांमध्ये तसेच कचरा कुंड्यांजवळ भटके, जखमी व मोकाट कुत्रे झुंडीत फिरत असतात. रात्री व दिवसा देखील हे कुत्रे टोळक्याने फिरतात. एखादा पादचारी किंवा दुचाकी वाहन दिसले की थेट त्यांच्यावर धावून जातात. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बऱ्याचदा या भटक्या कुत्र्यांमध्ये आपापसात भांडणे होतात. त्यामुळे रस्त्यावरुन जाणार्या वाहनांना अपघात होण्याचा धोकादेखील वाढला आहे. कुत्रे मध्ये आल्याने काही बाईकस्वार कोसळले देखील आहे. कुत्र्यांच्या सततच्या भुंकण्याचा त्रास लोकांना होतो. अनेक कुत्रे जखमी अवस्थेत फिरतात त्यामुळे त्यांच्या दुर्गंधीचा त्रास नागरिकांना होतो. त्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका देखील आहे. पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे लहान व शाळकरी मुले, वृद्ध आणि महिला यांना रस्त्यावरून चालणे धोक्याचे झाले आहे.

## पारंपरिक लोककलेचे सामने दरवर्षी होणार : सुनील तटकरे

झालेल्या या नाच मंडळाने विविध ढंगात व विविध रंगात तसेच शाहिरी जलशात आपली कला पेश केल्याने रसिकवर्गही बेहद खुश होऊन प्रेक्षकांनी व सर्व शाहिरांनी आयोजक सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान यांना धन्यवाद दिले.

कुडगाव येथील ओमसाई नृत्य कला पथक, दिघी येथील त्रैमूर्ती नाचपथक, भरडखोल येथील सगरपुत्र नाच मंडळ, दिघी येथील दत्त प्रासादिक नृत्य कलापथक, शिस्ते येथील जखमाता नृत्य कला पथक, बोर्ली येथील गणेश पेठ नृत्य, शिस्ते येथील जय हनुमान कला पथक, श्री सद्गुरू कृपा नृत्य कला पथक, दिघी येथील नूतन हनुमान नाच मंडळ, कपोली येथील जगदंबा नृत्य कला पथक, कुडगाव येथील ओमकार नृत्य कला पथक, वडवली येथील नाक्ती खोती नाच मंडळ तसेच मुळगाव कोळीवाडा दांडा येथील पंचवटी तुरा नाच मंडळ आदी मंडळांनी आपली कला सादर केली. या सर्व नाच मंडळांना सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान कडून ढोलकी व मानधन तसेच प्रशस्तिपत्र देण्यात आले.


# ग्रामपंचायत कोल्हारे

**ता.कर्जत, जि.रायगड**

## जाहीर सूचना

दि.२०/०९/२०२२

ग्रामपंचायत कोल्हारे, ता.कर्जत, जि.रायगड हे ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील ग्रामनिधी अंतर्गत पुढील विकासकामे करण्याकरिता सिलबंद निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | साई मंदिर ते बोपेले गावापर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे | ७४९९४८/- | ७४९९/- | २७/०९/२०२२ (सकाळी ११.00 वाजेपर्यंत) | २७/०९/२०२२ (दुपारी १२.00 वाजेपर्यंत) |
| २ | साई मंदिर ते कोल्हारे चार फाटा कोल्हारे पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे | ७४९९४८/- | ७४९९/- | २७/०९/२०२२ (सकाळी ११.00 वाजेपर्यंत) | २७/०९/२०२२ (दुपारी १२.00 वाजेपर्यंत) |
| ३ | नेरळ कळंब रोड ते धामोते गावापर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे | ७४९९४८/- | ७४९९/- | २७/०९/२०२२ (सकाळी ११.00 वाजेपर्यंत) | २७/०९/२०२२ (दुपारी १२.00 वाजेपर्यंत) |
| ४ | डिस्कव्हर हॉटेल ते शिवसेना शाखा धामोते पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे | ७४९९४८/- | ७४९९/- | २७/०९/२०२२ (सकाळी ११.00 वाजेपर्यंत) | २७/०९/२०२२ (दुपारी १२.00 वाजेपर्यंत) |

**अटी व शर्ती**

१) निविदा मिळणेकरिता दि.२१/०९/२०२२ ते २६/०९/२०२२ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.२१/०९/२०२२ ते २६/०९/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
३) भरलेल्या सिलबंद निविदा दि.२७/०९/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
४) आलेल्या निविदा दि.२७/०९/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
५) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत कोल्हारे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
६) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
९) निविदा किंमत ना परतावा राहील.
१०) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
११) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
१२) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% जीएसटी, २% आयकर, १% कर्मचारी विमा, रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१३) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१४) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
१५) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोल्हारे**
**ता.कर्जत, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोल्हारे**
**ता.कर्जत, जि.रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## म्हसळा भाजपा तर्फे रक्तदान शिबीराचे संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

भारतीय जनता पार्टी दाक्षिण रायगड जिल्हा तर्फे भारताचे आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसा निमीत्त सेवा पंधरवडाचे आयोजनाने म्हसळा तालुक्यांत रक्तदान संकल्प कार्यक्रमा अंर्तगत तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान शिबीराचे आयोजन मंगळवार दिं.२० सप्टेंबरला ग्रामिण रुग्णालय, म्हसळा येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य कृष्णा कोबनाक यांनी रक्तदान शिबिरातील रक्तदात्यांना व युवकांना मार्गदर्शन करतांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणासाठी वचनबद्ध आहे. देशातील गोर-गरीब, शोषित व वंचित वर्गाच्या कल्याणाकरिता देशसेवेचे ध्येय साध्य करत विविध जनकल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी समर्पित भावनेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कार्यरत असतात असे प्रतिपादन केले. यावेळी तालुका अध्यक्ष प्रकाश रायकर, महेश पाटील - सरचिटणीस, समीर धनसे - सरचिटणीस, तुकाराम पाटील - जिल्हा चिटणीस, शैलेश पटेल- मा.तालुका अध्यक्ष, संतोष पानसरे - शहर अध्यक्ष, शरद चव्हाण - युवामोर्चा अध्यक्ष, योगेश महागावकर - शिबीर प्रमुख, सुनंदा पाटील - महिला मोर्चा अध्यक्षा, रेश्मा सावरकर - महिला मोर्चा सरचिटणीस, जेष्ट कार्यकर्ते-रमेश पोटले, सुनील विचारे, मनोहर जाधव, भालचंद्र करडे, यशवंत म्हात्रे, राजा चव्हाण, युवा कार्यकर्ते आतीक उभारे, सुबोध पाटील, प्रशांत महाडिक, पंकज भाये, शरद कांबळे उपस्थीत होते. एकूण ५७ रक्तदात्यानी यावेळी रक्तदान केले.

## नुकसानग्रस्त दिघोडे ग्रामस्थांच्या उपोषणाला महेंद्र घरत यांचा पाठींबा

**दै.रायगड नगरी । उरण**




दिघोडे गावातील नुकसान ग्रस्त ग्रामस्थांना सिडकोकडून आर्थिक नुकसान भरपाई मिळावी या प्रमुख मागणीसाठी उरण तालुका काँग्रेसच्या माध्यमातून माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनिष पाटील यांनी दि १९/०९/२०२२ पासून उरण तहसिल कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. दि २०/०९/२०२२ रोजी उपोषणाचा दुसरा दिवस असून या उपोषण स्थळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत यांनी भेट दिली. सदर समस्या समजून घेउन या उपोषणाला कामगार नेते महेंद्र घरत यांनी आपला पाठींबा जाहिर केला.व आपणही ही समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे महेंद्र घरत यांनी यावेळी सांगितले.

१७/१२/२०२० रोजी हेटवणे ते नवी मुंबई मार्गावरील सिडको प्रशासनाची जलवाहिनी फुटल्याने त्यातून वाहणाऱ्या वेगाच्या पाण्याने दिघोडे गावातील अनेक घरात पाणी घुसून घरांतील साहित्यांचे खूप मोठे नुकसान झाले होते. १८ नुकसान ग्रस्त व्यक्ती बाधित असून या सर्वांना न्याय दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचे महेंद्र घरत यांनी यावेळी आपल्या मनोगतातून सांगितले. यावेळी महेंद्र घरत यांनी शासकीय अधिकारी यांना फोन करून सदर समस्या सोडविण्याची विनंती केली.

उपोषण स्थळी दिघोडे गावातील ग्रामस्थ, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनिष पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, किरीट पाटील, अखलाक शिलोत्री, संध्या ठाकूर, शहराध्यक्ष प्रकाश पाटील, सेवादल अध्यक्ष कमळाकर घरत, अफशा मुकरी, लंकेश ठाकूर, यशवंत म्हात्रे, विवेक म्हात्रे, शैलेश तामगाडगे आदी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत हे बेमुदत उपोषण असेच पूढे सुरु ठेवण्याचा निर्धार उपोषणकर्त्यांनी केला आहे.

## नवीन पनवेल उड्डाणपुल खड्डे मुक्त न झाल्यास रास्ता रोको आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल आणि नवीन पनवेल यांना जोडणाऱ्या नवीन पनवेल उड्डाण पुलाची अक्षरशः दैना झाली आहे. या ठिकाणचे खड्डे बुजविण्यासाठी टाकलेले पेव्हर ब्लॉक म्हणजे भीक नको पण कुत्रा आवर! असे म्हणायची पाळी आली आहे. अपघात झाल्याविना एकही दिवस जात नाही. यापूर्वीच्या प्रत्येक पावसाळ्यात उड्डाणपुलाच्या उतारावर होणाऱ्या खड्ड्यांचे प्रमाण बघता प्रशासनाने ते बुजविण्याची तजवीज करणे अत्यावश्यक होते. जनता जेव्हा जेव्हा रस्त्यावरती उतरली तेव्हा तेव्हा फक्त थातूरमातूर कामे करून जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामुळे भाजपच्या वतीने पनवेल भाजपा उपाध्यक्ष संदीप पाटील यानी रास्ता रोको आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

या पुलावरून होणाऱ्या रहदारीचे प्रमाण लक्षात घेता त्याच्या दोन्ही बाजूच्या उतारांवर आणी एच.डी.एफ.सी. सर्कल येथे सिमेंट काँक्रीटीकरण करणे हे अत्यंत गरजेचे आहे. परंतु भविष्यात काँक्रिटीकरण करणार म्हणून आज पडलेल्या खड्ड्यांकडे ढुंकूनही पाहणार नसाल तर आम्हाला आंदोलनाचे संविधानिक हत्यार उपसावे लागेल असे संदीप पाटील यानी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

परिसरातील शाळांचे प्रमाण पाहता हजारो विद्यार्थी या उड्डाणपूलावरून ये जा करत असतात, नोकरदार मंडळी, महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यावसायिक, ग्रामीण भागात भाज्या, रानभाज्या, फळे, फुले आदी उत्पन्न घेऊन ती विक्रीसाठी शहरात येणारे शेतकरी या साऱ्यांची आज उड्डाणपुलावरील खड्ड्यांमुळे दैना झाली आहे. हा रस्ता खड्डे मुक्त झाला नाही तर २२ सप्टेंबर रोजी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करावे लागेल. असे पाटील यानी सांगितले आहे.

## मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. हरिश्चंद्र फर्डे यांनी त्यांची लाल व काळ्या रंगाची हिरो होंडा फॅशन प्लस मोटारसायकल क्र. एमएच ०४ डी एल ७२८६ जिची किंमत ५ हजार रुपये इतकी आहे.

## पंच या भुमिकडे करीयर म्हणून बघावे : प्रसाद भोईर

**दै.रायगड नगरी । पेण**

कबड्डी खेळाला महत्व प्राप्त होतोय या खेळातील पंच हा महत्वाचा घटक आहे. या घटकाला महत्व प्राप्त झाले आहे. पंच या भुमिकडे करीयर म्हणुन बघणे गरजेचे आसल्याचे प्रतिपादन रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रसाद भोईर यांनी गडब येथे केले.

रायगड जिल्हा कबड्डी कबड्डी असोसिएशनच्या रायगड जिल्हास्तरीय कबड्डी पंच परिक्षेचे आयोजन गडब येथील जनता हायस्कुल गडब येथे करण्यात आले होते पंच परिक्षेत सहभागी होणा-या उमेदवारांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे उदघाटन रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रसाद भोईर, काराव- गडब सरपंच अर्पणा कोठेकर यांचे हस्ते करण्यात आले या वेळी माजी उपसरपंच तुलशिदास कोठेकर, रायगडजिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष गजानन मोकल, सहकार्यवाह रमेश म्हात्रे, सदस्य उल्हास पाटील, रायगडाजिल्हा कबड्डी असोसिएशनचे पंच प्रमुख जनार्दन पाटील, पंच मंडळाचे सदस्य के. जी. म्हात्रे, जितेद्र म्हात्रे, ऋणाली मोकल, अमित दळवी, राष्ट्रीय कबड्डी पंच प्रदिप मोकल, जितेंद्र कोठेकर, दिनेश पाटील, पदमाकर पाटील आदि सह परिक्षार्थी उपस्थित होते. या वेळी गजानन मोकल, रमेश म्हात्रे जनार्दन पाटील, के. जी. म्हात्रे, प्रदिप मोकल यांनी परिक्षार्थींना कबड्डी नियमा विषयी मार्गदर्शन केले.



## नागोठणे विभागात विश्वकर्मा पुजा उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यासह विभागातील सुकेळी येथील कंपन्यांमध्ये विश्वकर्मा पुजा उत्साहात संपन्न झाली. नागोठणे शहरात शिवसेना शाखा कार्यालयात तर सुकेळीतील महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड, विभोर, जिंदाल सॉ, रायगड प्लास्टिक, जिंदाल ड्रीलिंग अशा कंपन्यामध्ये विश्वकर्मा पुजा अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.

या परिसरातील काही कंपन्यांमध्ये विश्वकर्मा मुर्तींचे तर काही ठिकाणी विश्वकर्मा फोटोंचे पुजन करण्यात आले. येथील महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड या कंपनीमध्ये विश्वकर्मा मुर्तीची विधिवत पुजा करण्यात आली. तसेच कंपनीतील सर्वच यंत्रांचेही पुजन करण्यात आले. या विश्वकर्मा पुजेच्या वेळी नेहमीच कामावर व्यस्त असलेल्या सर्वच कामगारांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पहावयास मिळाला. दुपारी कंपनीतील सर्वच कामगारांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, श्री.दिपेन लष्कर यांचा दि.२६/०४/२०२१ रोजी परळीगुरी, पोस्ट कामपूर, नागाव, आसाम-७८२४२६ येथे मयत झाले व त्यांचा नंतर त्यांचे पत्नी श्रीमती.रिमझिम बोरा यांना श्री.दिपेन लष्कर यांचा नेक्स्ट टू किन प्रमणपत्र डेप्युटी कमिशनर, आसाम स्टेट गव्हर्नमेंट यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. श्री.दिपेन लष्कर यांचा मालकीचे खालीलप्रमाणे मिळकत आहे.

**मालमत्तेची वर्णन**

**५०% ऑफ फ्लॅट नं.१०५, पहिला मजला, बिल्डींग नं.I, विंग नं.३, ग्रीनवूड इस्टेट फेज-II, सर्व्हे नं.८, हिस्सा नं.३+४ बी, मौजे : हेदुटणे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र. क्षेत्रफळ २७.४६५ चौ.मी.कारपेट एरिया + ५.३५५ चौ.मी. बाल्कनी एरिया**

**फ्लॅट नं.१०४, पहिला मजला, बिल्डींग नं.I, विंग नं.३, ग्रीनवूड इस्टेट फेज-II, सर्व्हे नं.८, हिस्सा नं.३+४ बी, मौजे : हेदुटणे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र. क्षेत्रफळ २२.१७ चौ.मी.कारपेट एरिया + २.६१ चौ.मी. बाल्कनी एरिया**

वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ह्या नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत खालील पत्यावर दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचाही हरकत न आल्यास श्रीमती.रिमझिम बोरा यांना वरील मालमत्तेची मालक म्हणून कोणालाही विकू शकतात असा समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीची विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**मानस मोहंती**
**ॲडव्होकेट उच्च न्यायालय, बॉम्बे**
**ऑफिस नं.०८, राम हेरिटेज, प्लॉट नं.३२,**
**सेक्टर नं.१२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं.८१६९४७०८७३/९०२९४१८५०९**

**ॲड.अनिल जाधव**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्रं.६८१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०७/१०/२०२२

श्री.अनवरी रईस पटेल — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका तर्फे
मे.आयुक्त साहेब — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे सासरे पै.अल्लीमिया अब्दुल लतीफ पटेल दि.१०/०८/२०२१ रोजी मौजे कच्छी मोहल्ला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू झाला असून त्यांच्या मृत्यूची नोंद पनवेल महानगरपालिका यांचे दप्तरी झाली नसल्याने त्यांचे मृत्यूच्या नोंदीकरिता अर्जदार प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब पनवेल यांच्या कोर्टात सदरचा चौकशी अर्ज दाखल केला असून त्यांच्या मृत्यू नोंदणी बाबत कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची लागलीच कारवाई करेल आणि ते जर अर्जदार यांचे सासरे पै.अल्लीमिया अब्दुल लतीफ पटेल यांच्या मृत्यूचा दाखला घेण्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांच्या मृत्यूच्या नोंदणीचा मंजूर करेल याची दखल घ्यावी.

आज दि.१५/०९/२०२२ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **प्रथम वर्ग न्या.सो.पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **प्रथम वर्ग न्या.सो.पनवेल**

मा.सोनावणे साो

प्रो.जमा ६-२५ — **अर्जदाराचे वकील सुरेश कांबळे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०६१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/१०/२०२२

१) श्री.संतोष वसंत कदम
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्री.नितीन वसंत कदम
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
दोघेही रा.खोली क्र.२०१, ए विंग, दुसरा मजला,
सेक्टर-१८, प्लॉट क्र.१ आणि २,
अहिंसा को.ऑप.हौ.सो.लि., कामोठे, ता.पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
संध्या संजय मोहिते वगैरे २ — सामनेवाला

ज्याअर्थी कै.वसंत विठ्ठल कदम हे दि.२०/०४/२०१५ रोजी सेक्टर १८, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**खोली क्रं.२०१, ए विंग, दुसरा मजला, सेक्टर १८, क्षेत्र ५६.५७ चौ.मी. (बिल्टअप एरिया), प्लॉट क्र.१ आणि २, अहिंसा को.ऑप.हौ.सो.लि., कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र**

कै.वसंत विठ्ठल कदम यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असून, त्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाचा कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेव्दारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप करण्यांत आलेल्या मौजे - ओवळे निवाडा युनिट क्रमांक ५४ मधील सर्व्हे नंबर ४०/२०C, ७३/१०, ७३/७, ७५/२A, ७५/५A, हि जमिन खातेदार कृष्णा राघो पाटील यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पक नोड येथील भूखंड क्र. ७०, सेक्टर-८, क्षेत्र-१५५०.०० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

आता खातेदार कृष्णा राघो पाटील यांनी त्यांचा वाटपित झालेला पुष्पक नोड येथील भूखंड क्र. ७०, सेक्टर-८, क्षेत्र-१५५०.०० चौ.मी. या भूखंडाबाबत दुय्यम निबंधक पनवेल नोंदणी क्रमांक - पवल-५-५९०२-२०२२ दिनांक ०६.०४.२०२२ यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असून सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपित झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत. :-

| अ. क्र. | कृष्णा राघो पाटील व राम कृष्णा पाटील हे मयत असल्याने सादर केलेल्या वारसदाखल्यानुसार हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | कृष्णा राघो पाटील व राम कृष्णा पाटील हे मयत असल्याने सादर केलेल्या वारसदाखल्यानुसार लिहुन घेणार (ii) |
|---|---|---|
| १ | निराबाई कृष्णा पाटील | शरद कृष्णा पाटील |
| २ | पद्माबाई तानाजी नाईक | अक्षय राम पाटील |
| ३ | दर्शना दत्ता मुकादम | हर्षद राम पाटील |
| ४ | गीता विजय दुंदरेकर | |
| ५ | चांगुणा एकनाथ पाटील | |
| ६ | रत्नमाला राम पाटील | |

उपरोक्त हक्कसोडपत्रा नुसार केवळ टेबल क्र. (ii) मध्ये नमुद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यांत आलेले आहेत अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करून भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/२३५/२०२२-२३**


Process Deposited-Rs.100

**ADVOCATE FOR PETITIONER**
**ADV.ANIL V.KARNIK**

### PUBLIC NOTICE

**IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE SD AT PANVEL**

Civil Misc Appl No. 1573/2021
Exh No. : 18/D
N.D.14/10/2022

1.Shri.Himmatlal Haridas Vithalani
Age- 70 yrs, Occupation- Service,
2.Shri.Chirag Himmatlal Vithalani,
Age- 40 yrs, Occupation- Service,
Both residing at Flat No.002, A Wing,
Ground Floor, Shreenathji Residency,
Plot No.60, MCCH Society,Opposite
Navnath Mandir, Old Panvel.
Tal- Panvel, Dist- Raigad.
3.Smt.Aarti Tejas Badiyani,
Age- 39 yrs, Occupation- Service,
R/o. 402, Rekhi Residency, Sai Nagar
Road, Govind Greenfields, Old Panvel,
Tal- Panvel, Dist- Raigad. — Applicants

The General Public is hereby informed that Smt.Asha Himmatlal Vithalani expired on 28.03.2021 at Birmole Hospital, Panvel, Tal-Panvel, Dist –Raigad. The applicant no.1 is husband of late Asha Himmatlal Vithlani and applicant nos. 2, 3 are son and daughter of late Asha Himmatlal Vithalani respectively. The late Asha Himmatlal Vithalani was owner of below mentioned properties:

A) Store No.8, admeasuring about 108 Sq.ft. built up, Ground Floor, Siddheshwar Apartment, on City Survey No.1132-A, Old Panvel, Taluka-Panvel, District- Raigad.

B) Flat No.A 301, admeasuring about 423.73sq.ft, Third Floor, Shreenathji Residency, on Final Plot No.60, Old Panvel, Taluka- Panvel, District- Raigad.

(The Schedule of the above properties annexed with the present petition as "Schedule A")

**SCHEDULE A**

i) Store No.8, admeasuring about 108 Sq.ft. built up, Ground Floor, Siddheshwar Apartment, on City Survey No.1132-A, Old Panvel, Taluka-Panvel, and District- Raigad.

ii) Flat No.A 301, admeasuring about 423.73sq.ft, Third Floor, Shreenathji Residency, on Final Plot No.60, Old Panvel, Taluka- Panvel, District- Raigad.

The property mentioned in the 2(A) was purchased by late Asha Himmatlal Vithalani from M/s. Suyog Builders vide Registered Agreement for Sale dated 15th March 1991. The property mentioned in 2(B) was transferred and same was owned by the late Asha Himmatlal Vithalani through compromise decree dated 13.08.2013 passed by the Hon'ble Civil Judge Senior Division, Panvel in Special Civil Suit No.352/2009, which was filed by late Asha Himmatlal Vithalani and Smt. Hemal Kaushik Adhia against her mother late Jasumati Jamnadas Makhecha and against her son Shri.Rajesh Jamnadas Makhecha for relief of partition. However, the said dispute was amicably settled in between the parties to the said suit with their free consent. After the demise of Smt. Asha Himmatlal Vithalani the above mentioned properties which were owned by the late Asha Himmatlal Vithalani are still registered in the name of late Asha Himmatlal Vithalani in the records of Panvel Municipal Corporation and Sub-Registrar Panvel. It has become very much necessary for the applicants to transfer the Scheduled Properties on their name in the records of Panvel Municipal Corporation and Sub-Registrar Panvel as they are the legal heirs of the late Asha Himmatlal Vithalani. When the applicants approached the concerned authorities to mutate their name and accordingly transfer the Schedule Properties on their name as legal heirs of late Asha Himmatlal Vithalani. The concerned authority told them to obtain Heirship Certificate of late Asha Himmatlal Vithalani from the proper court of law. Therefore, the applicants have filed the present application for obtaining Heirship Certificate to the effect that the applicants are legal heirs of Late Asha Himmatlal Vithalani. The applicants state that the late Asha Himmatlal Vithalani was having absolute, legal and valid title over the schedule properties and the said properties were fully owned and possessed by her during her lifetime and after her death by the applicants. The applicants are the only legal heirs of late Asha Himmatlal Vithalani and they have every legal right to apply to this Hon'ble Court for obtaining Heirship Certificate that they are the legal heirs of late Asha Himmatlal Vithalani in respect of the schedule properties mentioned in this application. If anybody is having any objection, claim, interest, dispute, rights etc. in the above mentioned property in Schedule A he/she/they may appear in the Court with the documentary proof substantiating his/her/their objections/claims/details of dispute/s within Thirty (30) days of this publication, failing which the Hon'ble Court will grant heirship certificate to the applicants. The present notice is given on dt. 12th September 2022 with the seal of court.

Sd/- Superintendent Civil Court S.D. Panvel — Court Seal — Sd/- Asst. Superintendent Civil Court S.D. Panvel

# संक्षिप्त...

## जासई विद्यालयांमध्ये ज्युनिअर कॉलेजचा पालक मेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील जुनिअर कॉलेज, जासई. या विद्यालयात इयत्ता १२ वी वर्गांचा पालक मेळावा संपन्न झाला.

शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष कामगार नेते भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील तसेच विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे व इतर मान्यवरांचे स्वागत विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी केले आणि ही पालक सभा आयोजित करण्याचा हेतू स्पष्ट केला. सन २०२२- २३ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या सर्व वर्गांचे पालक मेळावे विद्यालयात पार पडले आहेत. शाळेच्या शिस्तीसाठी, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी पालकांचे सहकार्य मिळविण्याच्या हेतूने ह्या पालक मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. पालकांचे उद्बोधन करण्यासाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक रयत सेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक नूरा शेख तसेच ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख शिंदे एस. एस, गुरुकुल प्रमुख म्हात्रे जी.आर, प्राध्यापक अतुल पाटील,सर्व वर्गशिक्षक यांनी मार्गदर्शन केले. या पालक सभेसाठी मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा.दिपक शेडगे यांनी मानले.



सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम
दैनिक रायगड नगरी
9619979706 / 9619737911

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# महिलेच्या हत्या प्रकरणाचा छडा; सुपारी किलरसह ६ जण जेरबंद

### ३ लाखांची सुपारी देऊन हत्या घडवून आणल्याचे उघड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर १५ सप्टेंबर रोजी रात्री घडलेल्या प्रियंका रावत या महिलेच्या हत्या प्रकरणाचा खांदेश्वर पोलिसांनी छडा लावल्यानंतर पोलिसांनी या हत्या प्रकरणात सहभागी असलेला प्रियंकाचा पती देवव्रतसिंग रावत, त्याची प्रेयसी निकीता मतकर तसेच सुपारी किलरना हत्येची सुपारी देणारा निकीताचा साथीदार प्रविण घाडगे तसेच तिघे सुपारी किलर अशा एकूण सहा जणांना अटक केली आहे. सदर सर्वांनी मिळून नियोजनबद्ध रित्या प्लॅन आखून प्रियंकाची हत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे.

पनवेल मधील विहीघर येथे राहणारा मृत प्रियंकाचा पती देवव्रतसिंग रावत याचे निकीता मतकर (२४) हिच्यासोबत प्रेमसंबंध होते. या प्रेमसंबंधातून देवव्रतसिंग आणि निकीता या दोघांनी ऑगस्ट महिन्यामध्ये मंदिरामध्ये लग्न देखील केले होते. या दोघांमधील प्रेमसंबंधाची माहिती प्रियंका रावत हिला समजली होती. मात्र, देवव्रतसिंग आणि निकीता या दोघांच्या प्रेमात प्रियंका अडसर ठरत असल्याने तिचा कायमचा काटा काढल्यास देवव्रतसिंग सोबत आपल्याला पत्नी म्हणून कामयचे राहता येईल, असा विचार निकीताने केला होता. याच विचारातून निकीता आणि देवव्रतसिंग या दोघांनी प्रियंकाची सुपारी देऊन तिची हत्या करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, निकीता मतकर प्रविण घाडगे या क्लास चालकाकडे टिचर म्हणून काम करत असल्यामुळे तिने प्रविण घाडगे याला प्रियंकाची हत्या करण्यासाठी सुपारी किलरला शोधण्यास सांगितले होते. त्यानुसार घाडगे याने बुलढाणा येथील सराईत गुन्हेगार असलेल्या ३ सुपारी किलरला ३ लाख रुपयांची सुपारी दिली होती. तसेच त्यातील २ लाख रुपयांची रक्कम आगाऊ देऊन हत्येनंतर १ लाख रुपये देण्याचे त्यांना कबूल केले होते. त्यानंतर प्रियंकाचा पती देवव्रतसिंग याने प्रियंकाच्या प्रत्येक हालचालीची माहिती सुपारी किलरला दिल्यानंतर तिघा सुपारी किलरने १५ सप्टेंबर रोजी प्रियंका कामाला असलेल्या ठाण्यातील तिच्या कार्यालयापासून तिच्यावर पाळत ठेवली होती. तसेच तिचा ठाण्यापासून पनवेल पर्यंत लोकलमधून देखील पाठलाग केला.

प्रियंका पनवेल रेल्वे स्थानकात उतरल्यानंतर तिघा सुपारी किलर पैकी पंकज नरेंद्रकुमार यादव (२६) याने पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर प्रियंकाच्या गळ्यावर चाकुने वार करुन तिची हत्या करुन पलायन केले. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली होती. त्यामुळे खांदेश्वर पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरुध्द हत्येचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला होता. या तपासादरम्यान खांदेश्वर पोलिसांनी संशयावरुन प्रियंकाचा पती देवव्रतसिंग याच्या हालचालीवर लक्ष ठेवल्यानंतर त्याचे निकीता मतकर हिच्यासोबत प्रेमसंबध असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी देवव्रतसिंग आणि निकीता या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची स्वतंत्र चौकशी केल्यांनतर निकीता मतकर हिने प्रियंकाची हत्या घडवून आणल्याचे कबूल केले.त्यानुसार पोलिसांनी देवव्रतसिंग, निकीता मतकर आणि प्रविण घाडगे या तिघांना अटक केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांची अधिक चौकशी करुन बुलढाणा येथून रोहीत उर्फ शिव उर्फ रावत राजू सोनोने (२२), दिपक दिनकर लोखंडे (२५) आणि पंकज नरेंद्रकुमार यादव या तिघांना बुलढाणा येथून अटक केली. सदर तिघेही सुपारी किलर मुंबईत सराईत गुन्हेगार असून पाचोरा येथील एका फायरींगच्या गुन्ह्यात तिघे आरोपी फरार आहेत.

## पाली तहसील व पंचायत समिती कार्यालयात बसविले बायोमेट्रीक मशीन



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली तहसीलसह व इतर शासकीय कार्यालयातील लेटलतीफ व मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. कार्यालयात बायोमेट्रिक मशीन बसवण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते रविंद्रनाथ ओव्हाळ यांनी मे महिन्यात पाली तहसील कार्यालय आवारात उपोषण केले होते. त्या उपोषणाची दखल घेत तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी पाली तहसील कार्यालयात तर पाली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यादव यांनी गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर बायोमेट्रिक मशीन बसविले आहे.

यामुळे लेटलतीफ कर्मचाऱ्यांना आळा बसला आहे. शासकीय कार्यालयातील कर्मचारी आता वेळवर येत असल्याने कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची कामे देखील वेळेवर होतांना दिसत आहेत. याबद्दल तालुक्यातील लोकांनी रवींद्रनाथ ओव्हाळ यांचे आभार मानले.

## तळोजा तुरुंगात कैद्यांच्या नातेवाईकांसाठी प्रतिक्षालय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील तळोजा येथील मध्यवर्ती तुरुंगातील कैद्यांना भेटण्यासाठी येणाऱ्या नातेवाईकांना उन्हातान्हात कुठेतरी झाडाखाली बसून आपल्या प्रियजनाची वाट पाहत तिष्ठत बसावे लागत होते. सदर प्रकार गॅलेक्सी कंपनीचे सीएसआर प्रमुख आदर्श नय्यर यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तळोजा कारागृहाबाहेर सीएसआर फंडातून एका वेळेस शंभर लोक बसतील एवढे मोठे प्रतिक्षालय उभे केले आहे. या प्रतिक्षालयाचे उद्घाटन तरुण भार्गव, तुरुंग अधीक्षक यु, टी. पवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी अमित कक्कर सुब्रमण्यम, डॉ. अजित मगदूम, वृषाली मगदूम, मंजू नय्यर जनार्दन म्हात्रे, पोलीस अधिकारी, आदि उपस्थित होते.

गॅलेक्सी कंपनीचे सीएसआर प्रमुख आदर्श नय्यर यांनी देशभरात ३ हजार ठिकाणी सीएसआरच्या माध्यमातून लोकोपयोगी प्रकल्प हाती घेऊन ते पूर्ण केले आहेत. तळोजा तुरुंगातील कैद्यांना भेटण्यासाठी येणाऱ्या नातेवाईकांना उन्हातान्हात कुठेतरी झाडाखाली बसून आपल्या प्रियजनाची वाट पाहत तिष्ठत बसावे लागत होते. त्यामुळे नय्यर यांनी तुरुंग अधीक्षक यु.टी. पवार यांची भेट घेतली होती. यावेळी पवार यांनी त्यांना परवानगी देऊन योग्य जागा दाखविल्यानंतर नय्यर यांनी काही महिन्यांमध्ये एका वेळेस शंभर लोक बसतील एवढे मोठे प्रतिक्षालय उभे केले आहे. या प्रतिक्षालयात येणाऱ्या अभ्यागतांसाठी वॉशरुमची सुविधा करण्याबरोबरच त्यासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी बोअरवेल लावण्यात आले आहे. त्यामुळे आता सदर ठिकाणी २४ तास पाणी उपलब्ध झाले आहे.

प्रतिक्षालयाला लागून छोटेसे गार्ड रुम देखील बांधण्यात आले असून प्रवेशकक्षाची डागडुजी सुध्दा करण्यात आली आहे. प्रतिक्षालयात येणाऱ्या अभ्यागतांना आत्मिक शांती मिळावे यासाठी तेथील भिंतीवर चित्रकार शितल म्हात्रे यांची काही बोध प्रधान चित्रे आणि सुविचार देखील काढण्यात आली आहेत.

१५०० कैद्यांची क्षमता असलेल्या तळोजा कारागृहात ३००० पेक्षा जास्त कैदी आहेत. त्यांना भेटायला रोज ३५० व्यक्ती याप्रमाणे वर्षाकाठी एक लाख लोक दूरवरुन येत असतात. प्रतिक्षालय उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर या परिसरात उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

# मुलाच्या नोकरीसाठी गमावले १२ लाख

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सीबीआय किंवा मिलिटरी इंजिनिअरींग सर्व्हीसमध्ये नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून दोघा भामट्यांनी कळंबोलीतील एका व्यावसायिकाकडून तब्बल १२ लाख रुपये उकळून त्यांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. तुषार सिध आणि संजय सुर्वे अशी या दोघा भामट्यांची नावे असून कळंबोली पोलिसांनी त्यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणात फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव विजेश भोकरे (४७) असे असून ते कळंबोली, सेक्टर-३ मध्ये राहण्यास आहेत. भोकरे यांच्या साहील आणि सौरभ या दोन्ही मुलांचे पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्याने त्यांना नोकरी मिळावी, यासाठी ते प्रयत्न करत होते. जून २०२१ मध्ये सौरभचा मित्र शुभम यादव याच्याकडून दिल्ली येथे सीबीआयमध्ये नोकरी मिळत असल्याची माहिती भाकरे यांना मिळाली होती. त्यामुळे भोकरे यांनी सौरभ आणि साहिल या दोघांना दिल्ली येथे पाठविले होते. दिल्लीमध्ये तुषार भिमराव सि आणि संजय सुर्वे त्यांना भेटले. त्यांनी मिलिटरी इंजिनिअरींग सर्व्हसमधील नोकरीसाठी ५ लाख रुपये तर सीबीआय मधील नोकरीसाठी ७ लाख रुपये लागतील, असे सांगितले. त्यामुळे भोकरे यांनी साहीलसाठी मिलिटरी इंजिनिअरींगच्या नोकरीसाठी ५ लाख रुपये तर सौरभच्या सीबीआय मधील नोकरीसाठी ७ लाख रुपये अशी १२ लाख रुपयांची रक्कम तुषार सिध आणि संजय सुर्वे या दोघांच्या खात्यावर पाठवून दिली. भोकरे यांची दोन्ही मुले नोकरीच्या आशेने दिल्लीत थांबले होते. त्यानंतर ऑगस्ट २०२१ मध्ये संजय सुर्वे याने साहील याला कानपूर येथील मिलिटरी इंजिनिअरींग सर्व्हस कॅन्टेनमेन्टचा मासिक एन्ट्री पास देऊन त्याला त्याठिकाणी कामाला पाठविले.

मात्र, साहीलला तेथे तीन महिने ग्राऊंडवरील गवत काढण्याचे काम देण्यात आले. तेथे चौकशी केल्यानंतर तुषार सिध व संजय सुर्वे दोघेही मिलिटरी मध्ये नोकरीला नसल्याचे साहिलला समजले. त्यामुळे नोव्हेंबर २०२१ मध्ये साहील कळंबोली येथे निघून आला. तर दुसरीकडे तुषार सिध याने सौरभला सीबीआयमधील वर्ग डी-च्या पोस्टचे अपॉईंटमेंट लेटर दाखवले. मात्र, त्याला ते दिले नाही. दोघांनाही नोकरीला लावण्याचे फक्त तोंडी आश्वासन देऊन ठकसेन दुक्कलीने फक्त टाळाटाळ केली.

मात्र, त्यांनी कुणालाही नोकरीला लावले नाही. त्यामुळे भोकरे यांनी त्यांच्याकडे आपले पैसे परत मागितले असता ते देण्यासाठी देखील त्यांनी टाळाटाळ केली. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर भोकरे यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वाढदिवसानिमित्त तळा तालुका भाजपा तर्फे रक्तदान शिबिर

**दै.रायगड नगरी । तळा**

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी व रायगडचे पालकमंत्री मा. ना. रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून तळे तालुका भा.ज.पा. तर्फे मंगळवार दिनांक २० सप्टेंबर रोजी मुंढे यांची वाडी द्वारकामाई बंगलो येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान हे श्रेष्ठ दान असून मनुष्याला नेहमीच रक्ताचा उपयोग होत असतो. कोविड काळात शासकीय रक्तपेढी मधून रक्ताचा चा तुटवडा पडत असताना देखील अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्था बरोबरच राजकीय पक्षांनी देखील रक्तदान शिबिराचे आयोजन रक्त संकलन करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. एखाद्या अपघातग्रस्त किंवा रुग्णाला जीवदान देण्यासाठी रक्ताचा उपयोग होतो. अशावेळी या रक्तदान शिबिराचे महत्त्व कळते. भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या ७१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून तळे तालुका भा.ज.पा. ने हा एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला असून सेवा पंधरवडा म्हणुन पाळत असताना रक्तदान शिबिरा बरोबरच



स्वच्छता अभियान, मन की बात, एक भारत, विविधता मे एकता, आरोग्य तपासणी (महिला), अमृत सरोवर, वृक्षारोपण असे नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. असे महाराष्ट्र प्रदेश भाजपा सचिव रवींद्र मुंढे यांनी आपले मनोगतातून सांगितले. या रक्तदान शिबिरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले असून MGM हॉस्पिटलचे डॉ. किशोर बडगुजर, डॉ. निलेश पाटील, डॉ. रुपेश पाटील व त्यांचे सहकारी टीमने उत्तम सहकार्य केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी यावेळी स्वतः रवि मुंढे, माजी नगराध्यक्षा सौ. रेश्मा मुंढे, नगरसेवक रितेश मुंढे, समाजसेवक मोतीराम शिंदे, तालुका सचिव खेळू वाजे, रहाटाड सरपंच चांगदेव पाटील, उपसरपंच खंडागळे, उपाध्यक्ष त. ता. महादेव आडैं, महिला मोर्चा प्रमुख तळा शहर नीलिमा मुंढे, तळे तालुका महिला आघाडी प्रमुख प्रमिला चोरगे, युवा शहर प्रमुख सुयोग बारटक्के, महिला शहर प्रमुख सौ. संस्कृती वेदक, अशोक सकपाळ, शहर प्रमुख लहू चव्हाण, किशोर वेदक, वांजलेशी माजी सरपंच सुरेश शिंदे, नगरसेविका सुरेखा पवार, सुरेश मुंढे, कांबळे, डिंपल मुंढे यांचे सह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# माथेरान मधील मोकाट पिसाळलेल्या कुत्र्यांचा अकरा जणांना चावा

### निर्बीजीकरणासाठी ठोस पावले उचलावी स्थानिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

पर्यटनस्थळ माथेरान मध्ये मोकाट कुत्रांच्या नाहक त्रासामुळे स्थानिकांना तसेच पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सध्यातरी इथे मोकाट कुत्र्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे पायी चालत असताना जागोजागी कुत्र्यांची दहशत पहावी लागते. आज माथेरान बझार पेठे येथे पिसाळलेल्या दोन कुत्र्यांनी अकरा नागरिकांना चावा घेतला आहे, माथेरान मध्ये मागील महिन्यात असेच ठीक ठिकाणी कुत्रे पिसाळलेले असताना प्रशासनाने त्वरित पावले उचलून पिसाळलेल्या कुत्रांना पकडून घेऊन गेले होते, पण माथेरान मध्ये सद्या कुत्राचा उपद्रव नगरा नगरात दिसून येते आहे, साधरण रात्री झाली की कुत्राची झुंड च्या झुंड रस्त्यावर ओरडणे रडणे त्याच्यात मारामारी त्यामुळे ऐन झोपेच्या भरता ह्या कुत्र्याचा आरडाओरडा ने झोपचे खोबरे होऊन जाते, त्यातच इथे अनेकदा परिसरातील लोक आपल्या घरातील कुत्र्यांना आणत असतात आणि जाताना इथेच सोडून जात आहेत त्यामुळे इथे कुत्र्यांची पैदास मोठया प्रमाणात वाढली आहे.



मागील काळात नगरपालिका मार्फत असंख्य मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरणं केले होते. त्यावेळेस काहीअंश कुत्र्यांचे प्रमाण कमी दिसत होते परंतु सध्यातरी गावात बघावे तिकडे मोकाट कुत्री दिसत आहेत. त्यातच जे जखमी कुत्रे आहेत ते खूपच पिसाळलेले असल्याने अंगावर धावून जात आहेत अशाच कुत्र्यांनी आजवर अनेकांना जखमी केल्याच्या घटना ताज्या असताना सोमवारी दिवसभरात आठ नागरिकांना पिसाळलेल्या कुत्रांनी चावा घेतला आहे, तर एका गाई ला ही चावा घेतला आहे, महत्वाचे अनेक कुत्राना ही हे कुत्रे चावत असल्याने रेबीज चा प्रादुर्भाव वाढण्याची भीती व्यक्त होत आहे, जखमींना माथेरान बी, जे हॉस्पिटलमध्ये प्राथमिक रेबीज उपचार करून घरी सोडण्यात आले तर वैशाली उतेकर या महिलेस ज्यास्त प्रमाणात चावा घेतला असल्याने त्यांना रेबीज इंजेक्शन पुढील उपचार साठी एम जी एम हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले आहे, कालच्या एकूण परिस्थिती नुसार माथेरान मध्ये पिसाळलेल्या कुत्रांची संख्या वाढत आहे, याचा परिणामी आगामी काळात यामुळे काही विपरीत परिणाम होऊ नये यासाठी नगरपालिका प्रशासनाने वेळीच सदरची बाब गांभीर्याने घेणे आवश्यक असल्याचे जेष्ठ नागरिक बोलत आहेत.

## अज्ञात चोरट्यांकडून तीन लॅपटॉप व एका मोबाइलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पावसामुळे फुगलेल्या दरवाजाला कडी लागत नसल्यामुळे दरवाजा उघडा ठेवून झोपणे अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना महाग पडले आहे. चोरट्यांनी घरातून तीन लॅपटॉप व एक मोबाइल घेऊन पळ काढला आहे.



खारघरमधील सरस्वती अभियांत्रिकी विद्यालयात शिक्षण घेणारे चार विद्यार्थी बेलपाडा सेक्टर ३ मधील मोर्या दिषा या इमारतीमध्ये वास्तव्य करतात. पावसाळा सुरू झाल्यामुळे घराचा दरवाजा फुगला असून त्याची कडी व लॅच लागत नाही. रात्री दरवाजा पुढे ढकलून झोपले असताना चोरट्यांनी घरातील तीन लॅपटॉप व एक मोबाइल चोरून नेला आहे. याप्रकरणी खारघर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्तालय क्षेत्रात उघड्या दरवाजामधून घरात प्रवेश करून मोबाइल व लॅपटॉप चोरी करण्याचे प्रमाण वाढले आहे. नागरिकांनी पहाटेच्यावेळी घराबाहेर जाताना किंवा घरात किचनमध्ये काम करत असताना घराच्या दरवाजाची कडी लावली जावी. दरवाजाचा कडी, कोयंडा खराब झाला असल्यास तो दुरुस्त केला जावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. दरम्यान शहरात चोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे

## लम्पी आजाराबाबत आढावा व उपाययोजनांबाबत अलिबाग तहसील येथे समितीची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तहसिलदार मीनल दळवी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची लम्पी आजाराबाबतचा आढावा व त्यावरील उपाययोजनांबाबत सोमवार, दि.१९ सप्टेंबर रोजी अलिबाग तहसिलदार कार्यालय येथे बैठक संपन्न झाली.

या बैठकीत अलिबाग पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शुभांगी नाखले, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, अलिबाग डॉ.राजेश लाळगे, पंचायत समिती अलिबाग पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ.प्रिया काळे, नायब तहसिलदार व मंडळ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी तहसिलदार मीनल दळवी यांनी या समितीच्या स्थापनेबाबत शासनाच्या भूमिकेबाबत माहिती दिली. पंचायत समिती अलिबाग पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ.प्रिया काळे यांनी लम्पी आजाराची लक्षणे व त्यानुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत माहिती दिली. पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ.राजेश लाळगे यांनी लम्पी आजाराचा माणसांमध्ये प्रसार होत नाही तसेच दुग्धजन्य पदार्थ सेवन केल्यासही लम्पी आजार होऊ शकत नाही, अशी माहिती दिली. अलिबाग पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शुभांगी नाखले यांनी लम्पी आजाराची लक्षणे आढळल्यास त्वरित नजीकच्या ग्रामपंचायत व पशुवैद्यकीय अधिकारी यांना संपर्क साधावा, असे आवाहन केले.

लम्पी आजाराचा प्रादूर्भाव होऊ नये, यासाठी सर्व विभाग एकत्रित येऊन काम करतील, अशी भावना व्यक्त करून समितीच्या बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांचे तहसिलदार मीनल दळवी यांनी आभार मानले.